International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे

**केतकर स्वप्ना राजेंद्र**
*मानसशास्त्र विभाग*
*महिला महाविद्यालय ,कराड*
*Corresponding Author - केतकर स्वप्ना राजेंद्र*
**DOI - 10.5281/zenodo.10940560**

**'समस्या'(PROBLEM):**

वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत आणि अविवाहीत विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे.

**'प्रस्तावना' (Introduction):**

व्यक्तीला विविध वस्तूचे व्यक्तीचे, व्यक्तीसमूहाचे तसेच प्रसंगाचे अनुभव येत असतात. त्या गोष्टींकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन बनत जातो. आणि त्याचे मूल्यांकन ती विशिष्ट प्रकारे करू लागते. प्रत्येक समूह स्वतः च्या नीतिकल्पनांची व सामाजिक संस्थाची जपणूक करू पाहत असतो. तसेच व्यक्तीच्या ठिकाणी स्वतःच्या समूहाविषयी आपलेपणा व इतर समुहांबाबत परकेपणाची वृत्ती आढळते.

वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीचा अभ्यास करण्यासाठी महाविद्यालातील बी.ए. भाग 1, 2, 3 आणि बी. कॉम. भाग 1, 2, 3 या शाखेतील विद्यार्थिनीची निवड करण्यात आली.

अभिवृत्ती म्हणजे"एखाद्या वस्तूचे किंवा विषयाचे विशिष्ट दृष्टीकोनातून मुल्यांकन करण्याची प्रवृत्ती अशी काट्झ यांनी व्याख्या केली आहे.

**संशोधनाचे महत्व व गरज:**

अभिवृत्ती या मानसिक स्वरुपाच्या असल्यामुळे अर्थातचत्या प्रत्यक्ष दिसत नाहीत. त्या वर्तनाद्वारे म्हणजे हावभाव वागणे, बोलणे इ रूपाने व्यक्त होतात. उदा: वृद्धांविषयी तरुण कोणत्या प्रकारे बोलतात त्याच्याशी कसे वागतात यावरुन वृध्दांविषयीची अभिवृत्ती दिसून येते. महाराष्ट्रियांनी परप्रांतियांविषयी केलेल्या विनोदातून त्यांची अभिवृत्ती व्यक्त होत असते.

अभिवृत्ती अनुकूल अथवा प्रतिकूल स्वरूपाची असते. अभिवृत्ती मापन हे व्यावहारिक दृष्ट्या महत्त्वाचे ठरले आहे, एखादया प्रश्नाबाबतची जनतेची अभिवृत्ती समजली, तर त्या प्रश्नाशी

संबंधित असलेले कायदे जनता स्वखुशीने पाळील की नाही याचा अंदाज बांधता येतो. विवाहीत व अविवाहीत विदयार्थिनीची शिक्षक व पालक, शिस्त, जीवन व मानवता देश, धर्म. या घटकांबाबत अभिवृत्ती ची पातळी अभ्यासणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

**संदर्भ साहित्य :**

**1) McClosky (1958):**

अत्यत पूर्वापार रूढींना चिकटून राहणाऱ्या अमेरिकन राजकारण्यांचा यांनी सखोल अभ्यास केला.

**2) ॲडोर्नोव सहकारी (1950):**

काही व्यक्तित्व गुणांचा तसेच बालपणी कुटुंबात झालेल्या संस्कारांचा (socialization) अभिवृत्तींशी घनिष्ट संबंध असतो हीमहत्त्वाची गोष्ट ॲडोर्नोत्यांच्या सहकाऱ्यांनी दाखवून दिली आहे.

**मर्यादा:**

1. या संशोधनासाठी फक्त एकाच महाविद्यालयाचा अभ्यास करण्यात आला आहे.
2. या संशोधनासाठी मर्यादित नमुना निवडला आहे.
3. निष्कर्ष काढण्यासाठी हे संकलन अपुरे आहे.

**उद्दिष्टये(Objective):**

1) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत आणि अविवाहीत विद्यार्थिनींची अभिवृत्ती अभ्यासणे.
2) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत आणि अविवाहीत विद्यार्थिनींची शिक्षक व पालक या घटकाबाबत अभिवृत्तीची पातळी निश्चित करणे.
3) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत आणि अविवाहीत विद्यार्थिनींची शिस्त या घटकाबाबत अभिवृत्तीची पातळी निश्चित करणे.
4) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत आणि अविवाहीत विद्यार्थिनींची जीवन आणि मानवता या घटकाबाबत अभिवृत्तीची पातळी निश्चित करणे.
5) वरिष्ठ महाविदयालयातील विवाहीत आणि अविवाहीत विद्यार्थिनींची देश आणि धर्म या घटकाबाबत अभिवृत्तीची पातळी निश्चित करणे.

**सिद्धांत कल्पना (Hypothesis):**

1) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत विद्यार्थिनींपेक्षा अविवाहीत विद्यार्थिनींची अभिवृत्ती ही प्रतिकूल असल्याचे दिसून येईल.
2) वरिष्ठ महाविद्यालयातील अविवाहीत विद्यार्थिनीपेक्षा विवाहीत विद्यार्थिनींची शिक्षक व पालक या घटकाबाबत अभिवृत्ती ही अनुकूल असल्याचे दिसून येईल.

3) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत विद्यार्थिनींपेक्षा अविवाहीत विद्यार्थिनींची शिस्त दिसून येईलया घटकाबाबत अभिवृती प्रतिकूल . असल्याचे दिसून येईल.
4) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत विद्यार्थिनींची अभिवृत्ती जीवन व मानवता या घटका बाबत अविवाहित विद्यार्थिनींपेक्षा प्रतिकूल दिसून येईल.
5) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहीत विद्यार्थिनींपेक्षा अविवाहित विद्यार्थिनींची अभिवृत्ती देश व धर्म याबाबत अनुकूल दिसून येईल.

**परिवर्तके (Variable):**

1) स्वतंत्र परिवर्तक - विवाहीत आणि अविवाहीत विद्यार्थिनीं.

2) पारतंत्र परिवर्तक - अभिवृत्तीमध्ये होणारा बदल.

3) स्थिर परिवर्तक - अभिवृत्ती चाचणी, वर्ग, विद्यार्थिनी.

**संशोधन पध्दती (Research Method):**

**संशोधन फलिते:**

**नमुनानिवड :**

संशोधनासाठी महाविद्यालयातील विवाहीत आणि अविवाहीत विदयार्थिनींची निवड केली. त्यामध्ये विवाहीत 30 आणि अविवाहीत 30 अशा विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. तसेच या संशोधनासाठी कला आणि वाणिज्य अशा दोन शाखांच्या विद्यार्थिनींची निवड करण्यात आली.

**मापन साधने:**

या संशोधनासाठी सोदी यांची अभिवृत्ती मापन चाचणी वापरली आहे. यामध्ये 71 प्रश्न आहेत त्याद्वारे शिक्षक व पालक, शिस्त, जीवन व मानवता, देश, धर्म या पाच घटकांबाबत अभिवृत्तींचे मापन केले आहे प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी Yes ? No असे तीन पर्याय दिलेले आहेत. त्यातील एक पर्याय निवडला गेला आहे.

**संख्याशास्त्रीय विश्लेषण:**

1. मध्यमान (Mean)
2. प्रमाण विचलन )Standard Deviation)
3. 'टी'मूल्य)'T' score)

**तक्ता क्र. 1**

**1) शिक्षक व पालक अभिवृत्तीचेप्रमाण**

| विद्यार्थिनी | Mean | SD | 'T' score |
|---|---|---|---|
| विवाहीत | 4.64 | 3.497 | 0.004 |
| अविवाहित | 6.38 | 3.083 | |

वरिष्ठ महाविदयालयातील विवाहीत आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीमध्ये शिक्षक व पालक या घटकांबाबत लक्षणीय भेद दिसून येतो.

यावरून असे दिसून येते की विवाहित विद्यार्थिनींपेक्षा अविवाहित विद्यार्थिनींची अभिवृत्ती अनुकूल दिसून येते.

**तक्ता क्र 2**

**शिस्त अभिवृती**

| विद्यार्थिनी | Mean | SD | 'T' score |
|---|---|---|---|
| **विवाहीत** | **0.1** | **3.412** | **0.004** |
| **अविवाहित** | **1.42** | **2.061** | |

वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीमध्ये शिस्त या घटकांबाबत लक्षणीय भेद दिसून येतो.

यावरून असे दिसून येते की विवाहित विद्यार्थिनींपेक्षा अविवाहित विद्यार्थिनींची अभिवृत्ती अनुकूल दिसून येते.

**तक्ता क्र 3**

**जीवन आणि मानवता**

| विद्यार्थिनी | Mean | SD | 'T' score |
|---|---|---|---|
| **विवाहीत** | 4.4 | 4.517 | 1.136 |
| **अविवाहित** | 5.3 | 3.308 | |

वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीमध्ये जीवन आणि मानवता या घटकांबाबत लक्षणीय भेद दिसून येत नाही.

**तक्ता क्र 4**

**देश अभिवृत्ती**

| विद्यार्थिनी | Mean | SD | 'T' score |
|---|---|---|---|
| **विवाहीत** | 5.36 | 2.670 | 0.479 |
| **अविवाहित** | 5.62 | 2.644 | |

वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीमध्ये देश या घटकांबाबत लक्षणीय भेद दिसून येत नाही.

**तक्ता क्र 5**

**धर्म अभिवृत्ती**

| विद्यार्थिनी | Mean | SD | 'T' score |
|---|---|---|---|
| **विवाहीत** | 6.7 | 4.536 | 3.105 |
| **अविवाहित** | 9.36 | 4.014 | |

वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्याअभिवृत्तीमध्येधर्म या घटकांबाबत लक्षणीय भेददिसून येत नाही.

**तक्ता क्र 6**

**• एकूण विवाहीत आणि अविवाहित विद्यार्थिनींची अभिवृत्ती**

| विद्यार्थिनी | Mean | SD | 'T' score |
|---|---|---|---|
| **विवाहीत** | 21.1 | 0.798 | 8.540 |
| **अविवाहित** | 28.08 | 9.224 | |

एकूण विवाहित आणि विद्यार्थिनींची ५ घटकांबाबतच्या अभिवृत्तीमध्ये लक्षणीय भेद दिसून येतो.

यावरून असे दिसून येते की एकूण विवाहित विद्यार्थिनींपेक्षा अविवाहित विद्यार्थिनींची अभिवृत्तीही अनुकूल दिसून येते.

**निष्कर्ष (Conclusion):**

1) वरिष्ठ महाविदयालयातील विवाहीत आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीमध्ये शिक्षक व पालक या घटकांबाबत लक्षणीय भेद दिसून येतो.

२) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीमध्ये शिस्त या घटकां-बाबत लक्षणीय भेद दिसून येतो.

३) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीमध्ये जीवन आणि मानवता या घटकांबाबत लक्षणीय भेद दिसून येत नाही.

४) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीमध्ये देश या घटकां-बाबत लक्षणीय भेद दिसून येत नाही.

५) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या अभिवृत्तीमध्ये धर्म या घटकां-बाबत लक्षणीय भेद दिसून येत नाही.

६) वरिष्ठ महाविद्यालयातील विवाहित आणि अविवाहित विद्यार्थिनींच्या एकूण अभिवृत्तीमध्ये लक्षणीय भेद दिसून येतो.

**संदर्भ (Reference):**


1) बॅक, के .डब्ल्यू, इत्यादी (1977) सामाजिक मानसशास्त्र .न्यू यॉर्क जॉन विली आणि सन्स.
2) फेल्डमन, आर .एस. (1985) सामाजिक मानसशास्त्र सिद्धांत, संशोधन आणि अनुप्रयोग .न्यूयॉर्क मॅक ग्र-हिल
3) लिंडग्रेन एचसी (1991). सामाजिक मानसशास्त्राचा परिचय .नवी दिल्ली विली ईस्टर्न.
4) पांडे,जे. सं. (1981). भातातील प्रायोगिक सामाजिक मानसशास्त्रावरील दृष्टीकोनाता नवी दिल्ली संकल्पना.